आकर्षक लग्न पत्रिका

उत्तम क्वॉलिटी व उत्कृष्ट दर्जेची लग्न पत्रिका प्रिंटींग सह तसेच गिफ्ट पाकीट व फॅन्सी कार्ड शिट होलसेल भावात मिळण्याचे एकमेव ठिकाण

श्रीहरि पेपर प्रॉडक्टस्

"कार्ड हाऊस", गल्ली नं.५, धुळे

मो.94239 28900



मूल्य २.००

# आपला महाराष्ट्र

संस्थापक - लोकमित्र भाई मदाने

WWW.APLAMAHARASHTRA.IN

संयुक्त वर्ष ६८ ■ अंक क्र.१७५ ■ शनिवार ५ एप्रिल २०२५ ■ धुळे, नंदुरबार, जळगाव, नाशिक आवृत्ती ■ पाने ४

Post Regd.No./DHL/53/24-26



बॉम्बे चष्माघर

गल्ली नं.५, पारोळारोड कॉर्नर, धुळे

☎-235222,मो.9021853108




## ज्येष्ठ अभिनेते-दिग्दर्शक मनोज कुमार काळाच्या पडद्याआड

**मुंबई, दि.४- भारत कुमार या टोपणनावासाठी आणि देशभक्तीपर चित्रपटांसाठी ओळखले जाणारे ज्येष्ठ अभिनेते आणि चित्रपट दिग्दर्शक मनोज कुमार यांचे वयाच्या सत्त्याऐंशीव्या वर्षी कोकिलाबेन धीरूभाई अंबानी रुग्णालयात निधन झाले आहे. प्रदीर्घ काळापासून मनोज कुमार आजारी होते. प्रकृती अस्वास्थामुळे काही दिवसांपूर्वीच त्यांना रुग्णालयात दाखल करण्यात आलेले होते. त्यांच्या निधनामुळे सिनेसृष्टीसह संपूर्ण देशात शोककळा पसरली आहे.**

हिंदी चित्रपटातील ज्येष्ठ अभिनेते मनोज कुमार यांना १९९२ मध्ये पद्मश्री आणि २०१५ मध्ये दादासाहेब फाळके पुरस्काराने सन्मानित करण्यात आले होते. मुख्य भूमिका असलेला त्यांचा पहिला चित्रपट राजा खोसला यांचा १९६४ मधला मिस्ट्री थ्रिलर असलेला वो कौन थी? सुपरहिट ठरला. या चित्रपटातील लग जा गले आणि नैना बरसे रिमझिम ही गाणी प्रेक्षकांनी डोक्यावर घेतली. ही दोन्ही गाजलेली गाणी लता मंगेशकर यांनी गायली होती. हिंदी चित्रपटसृष्टीला अनेक उत्तम चित्रपट देणारे बॉलिवूडचे सुपरस्टार मनोज कुमार यांनी आपल्या चित्रपटांमधून लोकांना पडद्यावर देशभक्तीची खोल भावना अनुभवायला लावली. मनोज कुमार हे हिंदी चित्रपटांमध्ये देशभक्त अभिनेत्याचा चेहरा म्हणून ओळखले जायचे. असे म्हटले जाते की, भगतसिंग यांच्यावर या अभिनेत्याचा खूप प्रभाव आहे आणि त्यांनी शहीद सारख्या देशभक्तीपर चित्रपटांमध्ये काम केले आणि अनेकांसाठी प्रेरणास्थान बनले.

**मनोज कुमार यांचा अल्पपरिचय**

मनोज कुमार यांचा जन्म २४ जुलै १९३७ रोजी एबटाबाद (पाकिस्तान) (पान ४ वर)

## गर्भवती मृत्यूप्रकरणी चौकशीचे आदेश

मुंबई, दि.४- पुणे येथील दीनानाथ मंगेशकर रुग्णालयात तातडीने उपचार न मिळाल्याने श्रीमती तनिषा भिसे या भगिनीला आपला प्राण गमवावा लागला. ही घटना अत्यंत दुर्दैवी असून, शासनाने याची गंभीर दखल घेतली आहे. या प्रकरणाची सखोल चौकशी तज्ज्ञ डॉक्टरांच्या समितीद्वारे करण्याचे आदेश उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी दिले आहेत. या दुर्दैवी घटनेची गांभीर्याने दखल घेत उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी पुणे जिल्हाधिकाऱ्यांकडून याबाबतची संपूर्ण माहिती घेतली आहे. आरोग्य विभागाने तातडीने, पारदर्शक आणि निष्पक्षपणे चौकशी पूर्ण करण्याच्या सूचना दिल्या आहेत. रुग्णालय प्रशासनाने (पान ४ वर)

# दीनानाथ मंगेशकर हॉस्पिटलमध्ये गर्भवती महिलेचा मृत्यू पैशांसाठी हलगर्जी; विविध पक्ष संघटनांकडून आंदोलन

**पुणे, दि.४- पुण्यातील दीनानाथ मंगेशकर हॉस्पिटल प्रशासनाच्या हलगर्जीपणामुळे एका गर्भवती महिलेला आपला जीव गमवावा लागला आहे. या घटनेने समाजमन हादरुन गेले असून विविध पक्ष आणि संघटनांनी आज रुग्णालयाबाहेर जाऊन आपला आक्रोश व्यक्त केला. आधी दहा लाख भरा मगच महिलेवर उपचार सुरू करु, अशी भूमिका रुग्णालयाने घेतल्याने संबंधित महिला तनिषा भिसे यांना इतर रुग्णालयात उपचारासाठी जावे लागले. दरम्यान, त्या महिलेची प्रसुती झाली, तिने जुळ्या मुलींना जन्मही दिला. मात्र, त्यानंतर आपला जीव सोडला.**



रुग्णालय प्रशासनाच्या हलगर्जीपणामुळेच ही दुर्घटना घडल्याचे सांगत पीडित कुटुंबीयांनी गंभीर आरोप केले आहेत. त्यानंतर, शासनानेही याप्रकरणाची दखल घेत चौकशी करण्याचे आदेश दिले आहेत. दरम्यान, रुग्णालय प्रशासनाच्या अंतर्गत अहवालानुसार केवळ पैसे मागितल्यामुळे दिशाभूल करण्यात आल्याचे म्हटले आहे. मात्र, या घटनेनवरुन महिला आक्रमक झाल्या असून रुग्णालयाबाहेर आंदोलन केले जात आहे.

मृत गर्भवती महिला तनिषा भिसे ह्या १५ मार्च रोजी इंदिरा आयव्हीएफचे रिपोर्ट घेऊन त्या डॉक्टर घैसास यांना भेटल्या होत्या. अतिशय जोखमीच्या व धोकादायक प्रेग्नन्सीबद्दल डॉक्टर घैसास यांनी त्यांना माहिती दिली. दर ७ दिवसांनी तपासणीस बोलावले. त्याप्रमाणे त्यांनी २२ तारखेस येणे अपेक्षित होते, परंतु तेव्हाही त्या आल्या नाहीत असे सांगत मंगेशकर हॉस्पिटल प्रशासनाने आपला अहवाल दिला आहे. त्यामुळे, भाजपच्या महिला पदाधिकाऱ्यांनी डॉक्टर घैसास यांच्या अश्विनी नर्सिंग होम येथे जाऊन तोडफोड केली आहे. पुण्यातील भाजपच्या महिला पदाधिकाऱ्यांनी (पान ४ वर)

## वक्फ दुरूस्ती विधेयक काँग्रेस सुप्रीम कोर्टात

नवी दिल्ली, दि.४- केंद्र सरकारने आणलेल्या वक्फ दुरुस्ती विधेयकाला परवा लोकसभेत आणि काल राज्यसभेत मंजुरी मिळाली आहे. यानंतर काँग्रेसने या विधेयकाच्या घटनात्मक वैधतेला लवकरच सर्वोच्च न्यायालयात आव्हान देणार असल्याचे म्हटले आहे. काँग्रेसचे सरचिटणीस जयराम रमेश यांनी सोशल मीडिया प्लॅटफॉर्म एक्सवर लिहिले की, काँग्रेस लवकरच सर्वोच्च न्यायालयात वक्फ (दुरुस्ती) विधेयकाच्या घटनात्मकतेला आव्हान देईल. काँग्रेस पक्षाने सीएए, माहिती अधिकार कायदा आणि निवडणूक आचार नियम यासारख्या कायद्यांच्या घटनात्मक वैधतेला सर्वोच्च न्यायालयात आव्हान दिले आहे. आता काँग्रेस वक्फ दुरुस्ती (पान ४ वर)

## थाळनेर येथे दारूबंदीच्या मागणीसाठी महिलांचा मोर्चा मद्यविक्री रोखा, अन्यथा कायदा हातात घेण्याचा इशारा


**शिरपूर दि.४ (का.प्र.)- तालुक्यातील थाळनेर गावात खुलेआम दारूची विक्री होत असल्यामुळे कौटुंबिक जीवन व सुरक्षितता धोक्यात आलेल्या महिलांनी एकत्र येऊन ४ एप्रिलला धडक मोर्चा काढला. ग्रामपंचायत आणि पोलीस ठाण्याला निवेदन देऊन अवैध दारूविक्री बंद करा अन्यथा आम्ही कायदा हातात घेऊन ते काम करून दाखवू असा इशारा महिलांनी दिला.**



याबाबत मिळालेल्या माहितीनुसार थाळनेर परिसरात ठिकठिकाणी अवैधरित्या दारू विक्री होत असल्याने व्यसनाधीनतेचे प्रमाण वाढले आहे. त्यामुळे कोवळ्या वयातील मुले, युवक दारूच्या आहारी जाऊन त्यांच्यामध्ये वाद होतात. घरात, गल्लीत भांडणे होतात. अशा परिस्थितीमुळे त्रासलेल्या महिलांनी एकत्र येऊन ग्रामपंचायत व पोलीस ठाण्यावर मोर्चा नेला. ग्रामपंचायततर्फे सरपंच मेघा संदीप निकम यांनी निवेदन स्वीकारून दारूबंदीसाठी ग्रामपंचायतीच्या वतीने आवश्यक ते सर्व सहकार्य केले जाईल असे आश्वासन दिले. त्यानंतर थाळनेर पोलीस ठाण्यातील सहाय्यक निरीक्षक शत्रुघ्न पाटील (पान ४ वर)

## एमपीच्या बसची धडक वृद्ध इसम जागीच ठार

नंदुरबार, दि.४ (प्रतिनिधी)- नंदुरबार ते खेतीया रोडवर जम्मा पेट्रोलपंपाजवळ तीन एप्रिल रोजी सकाळी साडेअकरा वाजेच्या सुमारास मध्यप्रदेश परिवहनाच्या वाहनाने सायकलस्वारास ठोस दिल्याने मध्यप्रदेशातील वयोवृध्द जागीच गतप्राण झाला. चालक अपघाताची खबर न देता पसार झाला. या प्रकरणी एमपीच्या वाहनचालकाविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.तर गत महिन्यात झालेल्या अपघातातील जखमीचे उपचार घेतांना निधन झाले आहे. या प्रकरणी उपनगर पोलिसांत मोटारसायकलस्वाराच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. भिका काशिनाथ वाघ असे या (पान ४ वर)



## कारची काच फोडून रोकड लंपास सरकारी कार्यालयाबाहेरील घटना

**नंदुरबार, दि.४ (प्रतिनिधी)- बँकेतून काढलेली रक्कम घेवून वाहनाने शासकीय कार्यालयात पोहचत नाही तोवरच मागावर असलेल्या चोरट्यांनी वाहनाचे काच फोडत पन्नास हजाराची रक्कम लंपास केल्याने खळबळ उडाली आहे. शासकीय कार्यालयात वर्दळ असतांनाच हा प्रकार घडल्याने आश्चर्य व्यक्त होत आहे.**

शुक्रवारी चार एप्रिल रोजी सकाळी साडे अकरा वाजेच्या सुमारास नंदुरबार येथील एकात्मिक आदिवासी प्रकल्प. कार्यालयाच्या अवारात हा सर्व (पान ४ वर)

## अपघातातील जखमीचे उपचारादरम्यान निधन

नंदुरबार, दि.४ (प्रतिनिधी)- पाचोराबारी ते करणखेडा दरम्यान १३ मार्च रोजी दुपारी दिड वाजेच्या सुमारास घडली असून या अपघातात जामसिंग कालूसिंग वळवी ३६ हे गंभीर जखमींचे निधन झाल्याने उपनगर पोलिसांत फिर्यादीवरुन गुन्हा दाखल करण्यात आला आहे.होळी सणाचा बाजार करुन नंदुरबारहून धिरज गावाकडे जात असतांना नारायण फाट्याजवळ मोटारसायकलस्वाराने जोरदार धडक दिल्याने आई मुलगा जखमी झाला. उपचार दरम्यान मुलाचे निधन झाले तर आई वसंतीबाई कालूसिंग वळवी हया गंभीर जखमी झाल्या आहेत. मो.सा.क्र. एमएच ०३ सीजे ८८५६ या क्रमांकाच्या मोटारसायकलचालकाच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## निर्देश देवूनही अतिक्रमणे हटविण्यात दिरंगाई का? मनपा स्थायी सभेत आयुक्तांकडून अधिकारी फैलावर

**धुळे, दि.४- अतिक्रमण काढण्याचे निर्देश दिले तरी कारवाई का केली नाही? तुमचा काही इंट्रेस आहे का? निलंबन केल्यानंतर कारवाई करणार आहात का? यांसारखे अनेक सवाल उपस्थित करत अतिक्रमण विभागाच्या अधिकाऱ्याला मनपा आयुक्त अमिता दगडे-पाटील यांनी धारेवर धरले. स्थायी सभेत मांडण्यात आलेल्या एकुण अडोतीस विषयांपैकी एक विषय तहकुब ठेवण्यात आला. अधिकारी आपापल्या जबाबदाऱ्या पाळत नसल्याने आयुक्तांना संताप व्यक्त केला.**



स्व.दिलीप पायगुडे समिती सभागृहात घेण्यात आलेल्या स्थायी समितीच्या सभेप्रसंगी आयुक्त दगडे-पाटील यांच्या समवेत अति.आयुक्त करूणा डहाळे, उपायुक्त शोभा बाविस्कर, हेमंत निकम, सहा उपायुक्त किशोर सुडके, नगरसचिव मनोज मोरे यांच्यासह विविध विभागातील अधिकारी उपस्थित होते. स्थायी समितीच्या सभेत अतिक्रमणाचा विषय येताच आयुक्तांना रौद्ररूप धारण केले. शहरात अतिक्रमण काढल्यानंतरही पुन्हा त्याच ठिकाणी अतिक्रमण का दिसुन येते ? आपले लक्ष का नाही ? टॉवर बगिचा परिसरातील रस्त्यालगत (पान ४ वर)

## गडाकडे जाणारी वाहने टोलमुक्त करा

धुळे, दि.४- आदिशक्ती सप्तश्रृंगी मातेच्या दर्शनासाठी भाविक मोठ्या संख्येने हजेरी लावतात. भाविकांच्या वाहनांचा टोल न घेता सोडून द्यावे. या मागणीचे निवेदन टोल कंपनीच्या व्यवस्थापकाला कुलस्वामिनी श्री आशापुरी माता प्रतिष्ठानच्या वतीने देण्यात आले. सप्तश्रृंगी गडावर महाराष्ट्रासह मध्यप्रदेश, गुजरात राज्यातून भाविक पायी जातात. भाविकांच्या प्रवासी बॅग, वाजंत्री, भोजन साहित्य घेवून जाणाऱ्या तसेच दर्शन घेवून परत येणाऱ्या वाहनांकडून टोल वसुली करू नये. भाविकांची वाहने टोलमुक्त करावी अशी मागणी मोहन कोठावदे यांनी केली आहे.

## शेतकऱ्यांना भरपाई मिळवून देण्यासाठी प्रयत्न : आ.भदाणे अवकाळीने नुकसान झालेल्या शिवाराची केली पाहणी



**धुळे, दि.४- अवकाळी वादळ व पाऊसामुळे धुळे तालुक्यातील अनेक गावात शेतकऱ्यांचे मोठे नुकसान झाले आहे. शासकीय स्तरावरून पंचनामे करण्यात येत आहेत. नुकसाग्रस्त शेतकऱ्यांना नुकसान भरपाई मिळवून देण्यासाठी पूर्ण प्रयत्न करणार असण्याची ग्वाही धुळे ग्रामीणचे आमदार राम भदाणे यांनी शेतकऱ्यांना दिली आहे.**

बुधवारी अवकाळी पाऊस व वादळ मुळे अनेक शेतकऱ्यांचे नुकसान झाले आहे. गहू, हरबरा, कांदा काढणीवर आले होते. यांचे नुकसान झाले आहे. नेर परिसरात गारपीट मुळे फळ बागायतीचे प्रचंड नुकसान झाले आहे. हातातले पीक खराब झाल्यामुळे शेतकऱ्यांचे आर्थिक नुकसान झाले आहे. मका खाली पडला आहे. शुक्रवारी आमदार भदाणे यांनी शासकीय महसूल व कृषी विभाग यंत्रणा सोबत नेर, लोहगड, लोणखेडी, अकलाड, मोराणे, देऊर,उभंड, नांद्रे, भदाणे, शिरधाने, सैताळे, लामकानी येथील (पान ४ वर)



## शिरपूर पं.स.चे हजारो अर्ज पडून! लाभार्थ्यांचे प्रशासनाला निवेदन


**तऱ्हाडी, दि.४ (प्रतिनिधी)- पंचायत समिती, शिरपूर येथे रोजगार हमी योजनेचे सन २०१६ ते २०२५ पर्यंत नऊ वर्षांपासून साडेचार हजाराहून अधिक अर्ज प्रलंबित असल्याने आज क्षत्रिय शिवराणा कृषी विज्ञान मंडळ व बहुउद्देशिय संस्था, आढे ता.शिरपूर जि.धुळे या संस्थेच्यावतीने गटविकास अधिकारी प्रदीप पवार यांना निवेदन दिले. सर्व प्रलंबित अर्ज लवकरच निकाली काढून पात्र लाभार्थी यांना लवकरात लवकर लाभ देण्यात येईल,अशी ग्वाही पवार यांनी दिली.**

निवेदनात म्हटले आहे की, पंचायत समिती,शिरपूर येथे एवढे मोठे अर्ज प्रलंबित असणे तालुक्यासाठी धक्कादायक व अशोभनीय बाब आहे. रोजगार हमी योजनेचा वैयक्तिक लाभाचा शेततळे, गांडूळ खत, वैयक्तिक शौचालय, बांधावरील वृक्ष लागवड, गोठ्याचे व मुत्रखड्डा आणि गव्हाण, नाडेप कंपोस्ट, कंपोस्ट पीट, वैयक्तिक विहीर, फळबाग लागवड, शेळ्यांसाठी निवारा, कुक्कुटपालन शेड आदी योजनांसाठी तालुक्यातील अल्पभुधारक शेतकरी, भूमिहीन व पात्र लाभार्थी यांनी मोठ्या आशेने पंचायत समितीत अनेक अर्ज दाखल केलेले आहेत. योजनेचा लाभ मिळत नसल्याने अनेक लाभार्थी नाराजी व संताप व्यक्त करीत (पान ४ वर)

## सप्तशृंगी गड यात्रेनिमित्त भाविकांसाठी दर अध्यां तासाला एसटी

### धुळे विभागातून जादा बसेसची सुविधा

**धुळे, दि.४- उत्तर महाराष्ट्राचे आराध्यदैवत असलेल्या आद्यस्वयंभू शक्तीपीठ सप्तशृंगी मातेच्या यात्रोत्सवासानिमित्त राज्य परिवहन महामंडळाच्या धुळे विभागातून यंदाच्या वर्षीही प्रत्येक आगारातून जादा बसेस सह दर अर्ध्या तासाला एसटी बस प्रवाश्यांच्या सेवेसाठी सोडण्याचे नियोजन करण्यात आले आहे.**



नाशिक जिल्ह्यातील वणी येथील आई सप्तशृंगी देवीची चैत्र महिन्यात यात्रा भरत असते. यावर्षी यात्रोत्सवास शनिवार दि.५ एप्रिल पासून सुरूवात होत आहे. धुळे व नंदुरबार जिल्ह्यातून सप्तशृंगी गड येथे दर्शनासाठी मोठया प्रमाणात काही भाविक पायी तर काही भाविक एसटी महामंडळाच्या बसेसने जात असतात. या पार्श्वभूमीवर राज्य परिवहन महामंडळाच्या धुळे विभागातील धुळे, साक्री, शिरपूर, शिंदखेडा, दोंडाईचा, नंदुरबार, शहादा, अक्कलकुवा व नवापूर आगारांमधून जादा बसेस सह भाविकांची संख्या लक्षात घेता दर अर्ध्या तासाला सप्तशृंगी गडासाठी बसेस सोडण्यात येणार आहे. सप्तशृंगी गडावर तात्पुरत्या बसस्थानकाची सोय वणी येथील सप्तशृंगी गडावर भाविकांचे दर्शन झाल्यावर परतणाऱ्या धुळे व नंदुरबार जिल्ह्यातील भाविकासाठी स्वतंत्र एक तात्पुरत्या बसस्थानकाची सोय करण्यात आलेली आहे. या तात्पुरत्या बसस्थानकावरून धुळे, साक्री, नंदुरबार, शिरपूर, शहादा, शिंदखेडा, अक्कलकुवा, दोंडाईचा व नवापूरसाठी बसेस उपलब्ध होणार असून त्यामुळे भाविकांचा परतीचा प्रवास सोयीस्कर होणार आहे. सप्तशृंगी गडावर यात्रा कालावधीत भाविकांच्या सेवेसाठी व मार्गदर्शनासाठी धुळे विभागातील विविध आगारांचे सुमारे ३५ ते (पान ४ वर)



## पोलिसांनी गांजा तस्करी रोखली वाहनासह लाखोंचा मुद्देमाल जप्त

**धुळे, दि.४- शिरपूरकडून पुण्याच्या दिशेने चार चाकी वाहनातून होणारे गांजा तस्करी तालुका पोलिसांनी रोखली असून सहा लाख ८२ हजार रुपये किमतीचा ३१ किलो गांजा व तीन लाख रुपये किमतीची स्विफ्ट गाडी असा एकूण नऊ लाख ८२ हजार रुपये किमतीचा मुद्देमाल तालुका पोलिसांनी हस्तगत करत शिरपूरच्या वाहन चालकाला ताब्यात घेत गज-ाआड केले आहे. मुंबईच्या पथकाने दोन दिवसांपूर्वीच शिरपूर मध्ये छापा टाकत गांजा उध्वस्त केला होता. मात्र तरी देखील गांजा तस्करीच शिरपूर कनेक्शन समोर आल्याने पुन्हा एकदा शिरपूर तालुका चर्चेच्या केंद्रस्थानी आला आहे.**

कालूसिंग तेरसिंग पावरा, वय ३८ रा.रूपसिंग नगर, आंबा ता.शिरपूर असे ताब्यात घेतलेल्या चार चाकी वाहन चालकाचे नाव असून त्याच्या विरोधात तालुका पोलीस स्टेशन (पान ४ वर)

## शिक्षकांच्या मानधनवाढीसाठी मनसेचे आयुक्तांना निवेदन आंदोलकांसोबत शिक्षकांना पाहून आयुक्तांचा पारा चढला

**धुळे, दि.४- शहरातील ग.नं.५ मधील मनपाच्या इंग्रजी शाळा क्र.९ येथील शिक्षकांच्या मानधनात वाढ करण्याबाबत ठराव झाला. या ठरावानुसार आयुक्तांनी मानधनवाढीचे निर्देशही दिले. परंतु शिक्षण मंडळाचे अधिकारी दिगंबर दासरवाड यांनी आयुक्तांच्या आदेशाचे दुर्लक्ष करून तीन महिन्यांचे मानधन दिले नाही. शिक्षकांचे मानधन तसेच सहा महिन्यांची मुदतवाढ देण्यात यावी. अन्यथा संबंधित अधिकाऱ्याला काळे फासण्याचा इशारा मनसे पदाधिकाऱ्यांनी निवेदनाद्वारे दिला आहे.**



मनपा आयुक्त अमिता दगडे-पाटील यांनी मनपाच्या शाळा ग्र.९ मधील शिक्षकांना मुदतवाढ देत मानधन आठ हजारांऐवजी दहा हजार दरमहा करण्याचे आदेश दिले. आयुक्तांच्या आदेशाचे उल्लंघन करत शिक्षण मंडळाचे अधिकारी दिगंबर दासरवाड यांनी शिक्षकांना नियुक्तीचे आदेश दिले नाहीत. तसेच तीन महिन्यांचे महिन्यांचे मानधन दिले (पान ४ वर)

**धुळे, दि.४- धुळे जिल्ह्यासह खानदेशातील लाखो कुटुंबाची कुलस्वामिनी आई सप्तशृंगी देवीचा चैत्र यात्रा उत्सव सुरू होत आहे. वणी गडावर सप्तशृंगी देवीच्या दर्शनासाठी पायी जाणाऱ्या लाखो भाविकांसाठी सालाबादाप्रमाणे महाप्रसाद वाटपाचा कार्यक्रम जिल्ह्यातील सुप्रसिद्ध सामाजिक कार्यकर्ते, उद्योजक राजेंद्र शिंदे यांच्या दातृत्वातून शुक्रवार दि.४ एप्रिलपासून ते मंगळवार दि.८ एप्रिल असे पाच दिवस अखंड चोवीस तास सुरु करण्यात आले आहे. महाप्रसाद भंडारा वाटपाचे यंदाचे हे तेविसावे वर्ष आहे.**

## गडावर पायी जाणाऱ्या भाविकांसाठी राजेंद्र शिंदेंकडून महाप्रसाद वाटप सुरु

धुळे जिल्ह्यातून आणि शेजारच्या नंदुरबार जिल्ह्यातून लाखोंच्या संख्येने तरुण, महिला भाविक, आबालवृद्ध सप्तशृंगी देवीच्या दर्शनासाठी पायी वारी सुरू करीत आहेत. या सर्व देवीच्या भक्तांना महा प्रसाद भोजन वाटपाचा कार्यक्रम धुळे शहरातील मालेगाव रोडवरील मोठा हनुमान समोर, गुरुद्वारा चौक येथे ४ ते ८ एप्रिल पर्यंत अखंड पाच दिवस चोवीस तास आयोजित करण्यात आला आहे. कै.वालचंद बापूजी ग्रुप ऑफ हॉटेलचे प्रमुख राजेंद्र शिंदे पहेलवान यांच्या वतीने दरवर्षी हा अन्नदान भंडारा गडावर पायी जाणाऱ्या साठी देण्यात येतो, सलग बावीस वर्षापासून हा उपक्रम सुरू आहे त्याचे यंदा २३ वे वर्ष आहे. शुक्रवारी महा प्रसाद वाटपाला संत महंतांच्या उपस्थित सुरुवात झाली. महाप्रसाद वाटप सोबतच पायी जाणाऱ्या देवीच्या भक्तांना थंडगार पिण्याचे पाणी आणि आरामाची व्यवस्थादेखील करण्यात आली आहे. तरी सप्तशृंगी देवीच्या दर्शनासाठी जाणाऱ्या सर्व भाविकांनी महाप्रसाद भंडाऱ्याचा लाभ घ्यावा. असे आवाहन मा.आ.कुणाल पाटील, माजी नगरसेवक शिंदे, राजेंद्र शिंदे पहेलवान, शुभम अशोक पाटील, आकाश शिंदे, शुभम राजेंद्र शिंदे, समस्त शिंदे परिवार आणि कै. वालचंद बापूजी ग्रुप ऑफ हॉटेल आणि मित्र परिवाराने केले आहे.


दिपक ज्वेलर्स

सोने- 22 K -82,900 रु.+3% GST

सोने- 24 K -90,500 रु.+3% GST

चांदी- 97,000 रु.+3% GST

तारगल्ली, सराफ बाजार, धुळे

फोन नं.२३३१०३/२३४१०३

आपला महाराष्ट्र

# बलदंड देशप्रेमी अभिनेता पडद्याआड

भारतीय चित्रपट रसिकांच्या मनात देशभक्तीची भावना रुजविणारे ज्येष्ठ अभिनेते मनोज कुमार यांचे काल दीर्घ आजारानंतर निधन झाले. त्यांच्या निधनामुळे राष्ट्र प्रेमाचा जागर करणारा बलदंड अभिनेता काळाच्या पडद्याआड गेला आहे. दीर्घकाळपर्यंत मनोज कुमार यांनी निर्माण केलेल्या चित्रपटांची आठवण समाज जीवनात राहणार आहे. प्रजासत्ताक दिन असो की स्वातंत्र्य दिवस असो मेरे देश की धरती सोना उगले, उगले हिंरे मोती हे गीत ऐकायला मिळणारच हे आजपर्यंतचे समीकरण दुसरे कोणीही मोडू शकले नाही ही मनोज कुमार यांच्या चित्रपट निर्मितीची खासियत होती. अब तुम्हारे हवाले वतन साथियो, जहा डाली डाली पर सोनेकी चिडीया करती है बसेरा वह भारत देश है मेरा ही देशभक्तीपर चित्रपटातील गाणी ज्या प्रकारे आजही जिवंत आहेत त्याच प्रकारे मनोज कुमार यांच्या चित्रपटातील देशभक्तीपर गाणी जिवंत आहेत. मनोज कुमार उर्फ हरेकृष्ण गोस्वामी यांचा जन्म हा फाळणी पूर्वीच्या भारतातील होता. फाळणीमध्ये त्यांचा प्रदेश पाकिस्तानात गेला आणि हे पंजाबी कुटुंब दिल्लीत स्थायिक झाले. जरी फाळणीच्या जखमा अंगावर घेऊन ते भारतात आले असले तरी त्या जखमांमुळे बदल्याची भावना त्यांच्या मनात कधीच निर्माण झाली नाही. राजकीय क्षेत्रात फाळणी नंतर आलेले लोक अखेरपर्यंत कडवट भूमिकेत जगले. तशी कृतीही त्यांनी करून दाखवली. परंतु आपल्या जीवनाचे करियर म्हणून चित्रपट क्षेत्र निवडणारे मनोज कुमार यांनी मात्र देश प्रेमा शिवाय दुसरा कसलाही प्रचार केला नाही. हे त्यांचे वैशिष्ट्य होते. देश प्रेमाच्या संदर्भातील त्यांनी निर्माण केलेला सिनेमा म्हणजे उपकार होय. सुरुवातीपासून अखेरपर्यंत मनाची पकड घेणारा हा सिनेमा त्या काळात ठरला. त्यातील भारत या नायकाची मध्यवर्ती भूमिका मनोज कुमार यांनी केलेली आहे. लालबहादूर शास्त्री यांचा तो काळ होता आणि नेमका तो छोटा असला तरी युद्धजन्य होता. त्यांनी जय जवान जय किसान अशी घोषणा केली. त्यावर आधारित उपकार चित्रपट मनोज कुमार यांनी निर्माण केला. चित्रपट रसिकांनी तो अक्षरशः डोक्यावर घेतला. या चित्रपटापासून पूर्वाश्रमीचे खलनायक म्हणून पडद्यावर गाजलेले अभिनेते प्राण यांची जीवनशैलीच बदलली. चरित्र अभिनेता म्हणून ते पुढे आले आणि त्यांनी आपली जी आधीची प्रतिमा समाज जीवनात होती ती पुसून टाकली. कसमे वादे, प्यार वफा, सब बाते है, बातो का क्या, कोई किसी का नही है, झुठे वादे है वादो का क्या..हे गीत प्राण यांच्या तोंडी मनोज कुमार यांनी घातले आणि त्यांनाही आपल्या सोबत अजरामर केले. मेरे देश की धरती सोना उगले, उगले हिरे मोती हे याच चित्रपटातील गीत आहे. त्या काळात बॉक्स ऑफिसवर हिट ठरलेला हा चित्रपट होता.. आजच्या दे मार चित्रपटांच्या तुलनेत अतिशय वेगळा असा हा चित्रपट सर्वार्थाने लोकप्रिय ठरला. विशेष म्हणजे मनोज कुमार यांचे त्या चित्रपटातील नाव भारत असे होते. तेच नाव त्यांना लोकांनी दिले. आणि त्यांनीही ते स्वीकारले. पुढच्या काळात त्याच नावाने आपली ओळख ते देत असत. दोन संस्कृतीचा संघर्ष त्यांनी पूरब और पश्चिम या चित्रपटातून मांडला तो देखील रसिकांनी पसंत केला. त्यातील सायरा बानो यांचा अभिनय अजरामर ठरला. क्रांती हा चित्रपट देखील देशप्रेमावर बितलेला होता. स्वातंत्र्यानंतर जन्मलेल्या रसिक पिढीचे मनोज कुमार हे आयकॉन होते. कारण अभिनयात, चित्रपटाच्या विषयात, त्यातील संकल्पनेत त्यांनी इतरांपेक्षा वेगळेपण जपले होते. आणि ते वेगळेपण लोकांना हवे होते. मनोज कुमार यांची प्रमुख भूमिका असलेले इतरही चित्रपट गाजलेले आहेत. त्यात गुमराह, वह कौन थी, दस नंबरी, शहीद, आदी चित्रपटांचा समावेश आहे. मात्र उपकार, क्रांती, रोटी कपडा और मकान, पूरब और पश्चिम या चित्रपटांनी त्यांना स्वतंत्र अशी ओळख दिली. त्यातून त्यांनी देशभक्तीचा जागर केला. केवळ मनोरंजनाचे साधन म्हणून सीमित न ठेवता चित्रपटाला त्यांनी देश प्रेमा वर आधारित प्रबोधनाचे साधन म्हणून पुढे आणले. ही त्यांची ओळख अखेर पर्यंत कायम होती.

शिर्डीच्या साईबाबांवर मनोज कुमार यांची विशेष श्रध्दा होती. शिर्डी के साईबाबा हा चित्रपट त्यांनी निर्माण केला. तो देशभर गाजला. करोडो लोकांच्या मनात साईबाबांविषयी भक्तीभाव या चित्रपटाच्या माध्यमातून त्यांनी जागविला. या चित्रपटाच्या निर्मितीनंतर शिर्डीला विशेष महत्त्व प्राप्त झाले. लोकांचा ओघ त्या दिशेने सुरू झाला. इंटरनॅशनल दर्जाची हॉटेल्स तिथे निर्माण झाली. गरिबापासून अशा प्रकारे श्रीमंतांपर्यंत शिर्डीच्या साईबाबांचे महत्त्व वाढले. त्याचे खरे श्रेय मनोज कुमार यांनी निर्माण केलेल्या चित्रपटाला द्यावे लागेल. पटकथाकार, दिग्दर्शक आणि बलदंड अभिनेता अशी त्यांची ओळख होती. ती रसिकांच्या मनावर कायमची कोरली गेलेली आहे. दीर्घ आजारामुळे त्यांनी चित्रपट क्षेत्रातून संन्यास घेतला असला तरी त्यांनी निर्माण केलेली प्रतिमा मात्र सिने रसिकांच्या मनातून पुसली गेलेली नाही. हे त्यांच्या कारकिर्दीचे वैशिष्ट्य म्हणावे लागेल. शोर सारख्या चित्रपटातील एक प्यार का नगमा है, मोजो की रवानी हे त्यांचे गीत प्रत्येकाच्या तोंडी होते. आजही ते कायम आहे. त्यांना पद्मश्री पुरस्काराने गौरविण्यात आले होते. दादासाहेब फाळके पुरस्कार देखील त्यांना प्रदान करण्यात आला होता. अशोक कुमार, दिलीप कुमार यांच्या अभिनयाचा त्यांच्यावर प्रभाव होता. त्यांच्या अभिनयातून प्रेरणा घेऊनच मनोज कुमार यांनी चित्रपट सृष्टीत प्रवेश केला. त्या काळात आजच्यासारखे प्रशिक्षणाचे धडे देणाऱ्या संस्था अस्तित्वात नव्हत्या परंतु नाट्य क्षेत्र चांगलेच उदयाला आलेले होते. त्यामुळे चित्रपट सृष्टीत बहुदा स्टेज आर्टिस्ट अधिक असत. मनोज कुमार हे त्यापैकी एक होते. देवानंद, जॉय मुखर्जी, किशोर कुमार, धर्मेंद्र, संजीव कुमार, यांच्या समकालीन मनोज कुमार होते. त्यातील प्रत्येकाच्या वाटा वेगवेगळ्या होत्या. परंतु मनोज कुमार यांची वाट आणखी वेगळी होती. त्या पिढीतील धर्मेंद्र आज हयात आहेत. ते राजकारणाकडे वळले परंतु मनोज कुमार वळले नाहीत. मनोरंजनातून देशप्रेम हेच त्यांचे क्षेत्र त्यांनी निवडले. ते यशस्वी केले. आणि आजरामरही केले. त्यांच्यानंतरची अमिताभ बच्चन, राजेश खन्ना यांची पिढी मसाला चित्रपटात प्रसिद्ध पावली. अशा चित्रपटापासून मनोज कुमार यांनी मात्र दूरच राहणे पसंत केले.

मनोज कुमार हे दिसायला राजबिंडे आणि सुस्वरुप होते. बोलण्याची लकब आणि अभिनयाची पद्धत देखील इतरांपेक्षा वेगळी असणारा हा अभिनेता होता. तरुण चित्रपट रसिक त्यांना जास्त पसंत करीत. त्या काळात गाजलेल्या अभिनेत्रींच्या सोबत त्यांनी काम केलेले आहे. त्यात आशा पारेख, वहिदा रहमान, सायराबानो, जया भादुरी, हेमा मालिनी, मुमताज आदींचा समावेश आहे. अभिनेत्रींचा अभिनय प्रवास देखील तेवढाच त्याकाळात मोलाचा ठरला. चित्रपटाचे साधारणपणे तीन टप्पे पडतात. त्यातला पहिला टप्पा असा आहे की, तो निर्मितीच्या काळातील सुरुवातीचा टप्पा होता. तेव्हा स्त्री पात्र चित्रपटात काम करण्यासाठी अथवा नाटकात काम करण्यासाठी मिळत नसे. पुरुषालाच स्त्री अभिनेत्री चे काम करावे लागत असे. नंतरच्या काळात फार प्रयत्नाने हिंदीत देविका राणी, मराठीत शांता हुबळीकर यांच्यासारख्या स्त्री अभिनेत्रींचे पदार्पण झाले. त्यांचा अभिनय आणि त्यांच्यासोबतच्या नायकांचा अभिनय हा नाटकाच्या स्टेज वरचा होता. नंतर अभिनयाचे इन्स्टिट्यूट निर्माण झाले. त्यामुळे प्रशिक्षित पिढी या व्यवसायात येऊ लागली. आज तंत्र दृष्ट्या आणि अभिनयाच्या दृष्टीने खूप प्रगत अशी कलावंतांची पिढी पुढे आली आहे. त्यांना आणि त्यांचा अभिनय पसंत करणाऱ्या पिढीला कदाचित त्या कलावंतांचे काम कसेतरीच वाटत असेल. किंवा ते नापसंत करीत असतील. परंतु आज ज्या ठिकाणी चित्रपट क्षेत्र उभे आहे त्याची पायाभरणी त्या पिढीने केली म्हणूनच ते क्षेत्र विकसित होऊन आजच्या मुक्कामापर्यंत पोहचले.मधल्या पिढीने त्यास खतपाणी घातले. त्यामुळे चित्रपट सृष्टीचा वृक्ष बहरला. मनोज कुमार हा त्या पिढीतील मैलाचा दगड आहे. त्यांची कामगिरी विसरली जाऊ शकत नाही.

# जागतिक आरोग्य दिन; आरोग्याचे महत्त्व लक्षात आणून देण्याचा दिवस

**धुळे, दि.४- जागतिक आरोग्य दिन प्रत्येक वर्षी ७ एप्रिल रोजी साजरा केला जातो. हा दिवस जागतिक आरोग्य संघटना (डब्ल्यूएचओ) ने १९४८ मध्ये स्थापन केला होता. आणि तेव्हापासून हा दिवस दरवर्षी आरोग्यविषयक जागरूकता निर्माण करण्यासाठी, सर्व लोकांसाठी चांगल्या आरोग्य सेवा उपलब्ध होण्यासाठी, तसेच आरोग्याच्या विविध समस्यांवर लक्ष केंद्रित करण्यासाठी साजरा केला जातो.**

जिल्हा परिषद आरोग्य विभागामार्फत ७ एप्रिल २०२५ रोजी जागतिक आरोग्य दिन साजरा करण्यात येणार आहे. हा दिवस आरोग्याच्या महत्त्वाची जागरूकता निर्माण करण्यासाठी आणि आरोग्यविषयक पद्धतींचा पुनरावलोकन करण्यासाठी अत्यंत महत्त्वाचा आहे. या वर्षीचे जागतिक आरोग्य दिनाचे घोषवाक्य आरोग्यदायी सुरवात, आशांदायी भविष्य..!

जागतिक आरोग्य दिनाचा उद्देश : जागतिक आरोग्य दिनाचा मुख्य उद्देश आरोग्यविषयक जागरूकता निर्माण करणे आणि समाजाच्या आरोग्याशी संबंधित विविध मुद्यांवर लक्ष वेधणे आहे. या दिवशी विविध आरोग्यसंस्थांची सहभाग असतो, जे विविध आरोग्यविषयक समस्या आणि उपायांविषयी जनतेला मार्गदर्शन करतात.

जागतिक आरोग्य दिनाचे महत्त्व : आरोग्यविषयक जागरूकता : जागतिक आरोग्य दिन आरोग्याच्या महत्त्वाची जनजागृती करणारा दिवस आहे. यामध्ये विविध आरोग्य समस्यांविषयी माहिती दिली जाते, ज्यामुळे समाज अधिक जागरूक होतो.

चांगल्या आरोग्य सेवेची आवश्यकताः हा दिवस आरोग्य सेवेच्या गुणवत्तेवर लक्ष केंद्रित करतो आणि प्रत्येक व्यक्तीला



उत्तम आरोग्य सेवा मिळण्याचा हक्क दिला जातो.

आहार, व्यायाम आणि मानसिक आरोग्य : प्रत्येक व्यक्तीला चांगले आहार घेणे, नियमित व्यायाम करणे आणि मानसिक आरोग्य जपणे आवश्यक आहे. या दिवशी हे सर्व मुद्दे लोकांना समजावून सांगितले जातात.

वाढते प्रदूषण आणि आरोग्य : प्रदूषणाचे प्रमाण दिवसेंदिवस वाढत आहे, आणि याचा परिणाम आरोग्यावर होतो. हवेतील घातक रासायनिक पदार्थ, जलप्रदूषण आणि मातीतील विषारी पदार्थ यामुळे विविध आरोग्य समस्या निर्माण होतात. या समस्यांवर लक्ष देणे अत्यंत महत्त्वाचे आहे. आधुनिक जगात आरोग्य आणि पर्यावरण या दोन गोष्टी एकमेकांशी सुसंगत आहेत. जर आपले पर्यावरण निरोगी असेल, तर आपल्याला चांगले आरोग्य मिळवता येईल. यासाठी प्रदूषण कमी करणे, स्वच्छतेचे पालन करणे आणि पर्यावरणाची काळजी घेणे आवश्यक आहे.

जागतिक आरोग्य दिनानिमित्त, जिल्ह्यातील सर्व प्राथमिक आरोग्य केंद्रे आणि उपकेंद्रे जागरूकता कार्यक्रम आयोजित करण्यात येणार आहेत. यामध्ये शारीरिक आरोग्य, मानसिक आरोग्य, लसीकरण, स्वच्छता, आणि पौष्टिक आहार यावर भर देण्यात येईल. या कार्यक्रमामध्ये स्थानिक समुदायांना आरोग्यविषयक माहिती दिली जाईल आणि त्यांचे आरोग्य सुधारण्यासाठी मार्गदर्शन करण्यात येईल. जागतिक आरोग्य दिनानिमित्त सर्व नागरिकांनी या महत्त्वपूर्ण दिवशी आरोग्याच्या पद्धतीवर विचार करून त्यात योग्य बदल करा. आरोग्याची काळजी घेणारे समाजच अधिक समृद्ध, सुखी आणि बलवान बनतात. जागतिक आरोग्य दिनाच्या निमित्ताने, आपण सर्वजण निरोगी राहण्यासाठी वचनबद्ध होऊया. असे आवाहन जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ.सचिन बोडके यांनी पत्रकान्वये केले आहे.




# दर्जेदार शैक्ष.व्हिडिओ निर्मिती स्पर्धेत गजानन लांबर्डे यांना पारितोषिक

**शिरपूर, दि.४- राज्य शासनाच्या शिक्षण विभाग राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद तसेच जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था धुळे यांच्या संयुक्त विद्यमाने शिक्षकांसाठी दर्जेदार शैक्षणिक व्हिडिओ निर्मिती स्पर्धा सन २०२३ मध्ये घेण्यात आली होती. या स्पर्धेत आर.सी.पटेल अनुदानित प्राथमिक आश्रम शाळा निमझरी येथील प्राथमिक शिक्षक गजानन लांबर्डे यांनी प्राथमिक गटात इयत्ता तिसरी ते पाचवीसाठी गणित विषयाचा व्हिडिओ सादर केला होता. त्यास तालुकास्तर द्वितीय तसेच जिल्हास्तर द्वितीय क्रमांक प्राप्त झाला.**

धुळे डाएट या ठिकाणी नुकताच बक्षीस वितरण समारंभ पार पडला.या कार्यक्रमात प्रमाणपत्र, सन्मानचिन्ह तसेच अकरा हजार रुपयांचा धनादेश वितरित करण्यात आला. कार्यक्रमाला प्राथमिक शिक्षणाधिकारी डॉ. किरण कुवर, डायट प्राचार्य डॉ. मंजुषा क्षीरसागर, सर्व ज्येष्ठ अधिव्याख्याते, दर्जेदार व्हिडिओ निर्मिती स्पर्धेचे समन्वयक डॉ. बी.आर.पाटील उपस्थित होते. तालुकास्तरीय व जिल्हास्तरीय बक्षीस मिळाल्याबद्दल शिरपूर एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष तथा माजी शालेय शिक्षण मंत्री आमदार अमरिशभाई पटेल, कार्याध्यक्ष भूपेशभाई पटेल, उपाध्यक्ष राजगोपाल भंडारी, उद्योगपती चिंतनभाई पटेल, सचिव सौ.रेशा पटेल, सीईओ डॉ.उमेश शर्मा, प्राचार्य पी.डी. पावरा, मुख्याध्यापक पी.एन. लोहार, सर्व शिक्षक व कर्मचारी आदींनी अभिनंदन केले.

# नुकसानीचे तात्काळ पंचनामे करा पालकमंत्री रावल यांच्या सूचना

**दोंडाईचा, दि.४- मागील दोन दिवसात जिल्ह्यातील अनेक भागात वादळी वारा व अवकाळी पाऊस झाल्याने शेतपिकांचे मोठे नुकसान झाले असून या नुकसानीचे तात्काळ पंचनामे करून शासनाला अहवाल सादर करावा अश्या सूचना धुळे जिल्ह्याचे पालकमंत्री तथा राज्याचे पणन व राजाशिष्टाचार मंत्री जयकुमार रावल यांनी धुळे जिल्हाधिकाऱ्यांना दिल्या आहेत.**

गेल्या दोन दिवसापासून धुळे जिल्ह्यातील अनेक भागात वादळी वारा, गारपीटसह अवकाळी पावसाने जोरदार हजेरी लावली, यामुळे शेतकऱ्याच्या शेतापिकाचे व शेतामालाचे मोठे नुकसान झाले आहे, यात शेतकऱ्यांच्या शेतात काढनिसाठी ठेवलेले गहू, हरभरा पिकांचे मोठे नुकसान झाले आहे तसेच काही शेतकऱ्यांचा कांदा तयार होता परंतु अवकाळी पावसामुळे तोही खराब झाला आहे. काही भागात गारपीट झाली आहे त्यामुळे शेतकऱ्यांच्या शेतातील फळबाग, मका व उन्हाळी पिकांचे देखील नुकसान झाले आहे. ज्या ज्या भागात असे नुकसान झाले आहे त्या सर्व ठिकाणी जाऊन तात्काळ पंचनामे करून त्याचा अहवाल लवकरात लवकर शासनाला द्यावा अशा सूचना रावल यांनी जिल्हाधिकाऱ्यांना केल्या आहेत.



# का.स.वाणी संस्थेतील डिप्लोमा प्रिंटींगच्या विद्यार्थ्यांची निवड



**धुळे, दि.२- येथील का. स. वाणी मराठी प्रगत अध्ययन संस्थेतील प्रिंटींग डिप्लोमाच्या विद्यार्थ्यांसाठी वापी(गुजरात) येथील मल्टिनॅशनल कंपनी ई.पी.एल.लिमिटेड व हैद्राबाद येथील श्रीनाथ रोटोपॅक प्रा. लि. यादोन्ही कंपन्यांनी कॅम्पस इंटरव्ह्यूचे आयोजन केले होते. यात वापी येथील ई.पी.एल. कंपनीने १२ विद्यार्थ्यांची व हैद्राबाद येथील श्रीनाथ रोटोपॅक प्रा. लि. या कंपनीने १३ विद्यार्थ्यांची निवड केली.**

पॅकेजिंग क्षेत्रात झालेलीतंत्रज्ञानाची प्रगती व बाजारातील वाढती मागणी यामुळे मुद्रण क्षेत्रात शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना प्रचंड मागणी निर्माण झाली आहे. ग्रामीण भागातील होतकरू व मेहनती विद्यार्थ्यांसाठी या क्षेत्रात उत्तम करिअर करण्याची संधी आहे. आजपर्यंत प्रिंटिंग डिप्लोमा अभ्यासक्रम उत्तीर्ण झालेल्या हजाराहून अधिक विद्यार्थ्यांना बहुराष्ट्रीय कंपन्यातून नोकरीच्या संधी मिळाल्या आहेत. काही विद्यार्थी विदेशात चांगल्या पगाराची नोकरी करीत आहेत. तसेच काही विद्यार्थी स्वत:च्या व्यवसायात यशस्वी झाले आहेत. निवडप्रक्रियेतील कंपनीचे अधिकारी हेमंत पारसे व वामसी कृष्णा यांनी विद्यार्थ्यांच्या मुलाखती घेतल्या व मार्गदर्शन केले. निवड झालेल्या यशस्वी विद्यार्थ्यांचे संस्थेचे विश्वस्त, पदाधिकारी, कर्मचारी व मुद्रण शिक्षण विभागाचे कोर्स-को ऑर्डिनेटर जितेंद्र सोनगिरे, व्यवस्थापक गिरीश केले, मुद्रण शिक्षण विभागप्रमुख प्रा. प्रसाद पुराणिक यांनी अभिनंदन केले आहे.

# एच.आर.पटेल महिला महाविद्यालयात जागतिक ग्राहक हक्क दिन साजरा

**शिरपूर, दि.४- एच.आर. पटेल महिला महाविद्यालयात जागतिक ग्राहक हक्क दिन साजरा करण्यात आला. या निमित्ताने आर.सी.पटेल कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालयातील अर्थशास्त्र विभागाचे डॉ.ए.जी. सोनवणे यांचे व्याख्यान आयोजित करण्यात आले होते.**

जागतिक ग्राहक हक्क दिन ची संकल्पना आहे शाश्वत जीवनशैलीसाठी योग्य बदल. हे बदल होताना ग्राहकांच्या मूलभूत हक्कांचे आणि गरजांचे पालन केले जाईल याची खात्री देत सर्व ग्राहकांना परवडणारे, सुलभ शाश्वत आणि आरोग्यदायी जीवनशैलीचे पर्याय तातडीने उपलब्ध करुन देण्याची गरज या संकल्पनेतून प्रतिबिंबित होते. ही मोहीम, शाश्वत जीवनशैली साध्य करण्यासाठी आवश्यक मार्गांवर प्रकाश टाकते आणि जगभरात ग्राहक संरक्षण मजबूत आणि सक्षम करण्याचे आवाहन डॉ.ए.जी. सोनवणे यांनी केले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्या डॉ. शारदा शितोळे व प्रमुख अतिथी उप प्राचार्य व सिनेट सदस्य डॉ. गजानन पाटील उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक अर्थशास्त्र विभाग प्रमुख डॉ.मनिषा चौधरी यांनी केले. यावेळी डॉ.के. बी. पाटील, डॉ. इंदिरा गिरासे, प्रा.विद्या पाटील, प्रा.ललिता पाटील कार्यक्रमास उपस्थित होते. हर्षदा पाटील आभार मानले.

# भाजपची आज धुळ्यात बैठक

धुळे, दि.४- भारतीय जनता पार्टी संघटन पर्व सदस्य नोंदणी अभियानाच्या अनुषंगाने प्रदेश महामंत्री तथा उत्तर महाराष्ट्र प्रभारी विजय चौधरी, उत्तर महाराष्ट्र संघटनमंत्री रविंद्र अनासपुरे यांच्या प्रमुख उपस्थित धुळे ग्रामिण, धुळे महानगर व मालेगांव या जिल्ह्यांची पक्ष पदाधिकाऱ्यांची संघटनात्मक बैठक शनिवार ५ एप्रिल रोजी आयोजित केल्याची माहिती जिल्हाध्यक्ष बबनराव चौधरी, धुळे महानगर जिल्हाध्यक्ष गजेंद्र अंपळकर व मालेगांव जिल्हाध्यक्ष प्रा.निलेश कचवे यांनी दिली. भाजपाचे संघटन पर्व सदस्य नोंदणी अभियान गेल्या दोन महिन्यापासुन सुरु आहे. आगामी कार्यक्रमांच्या अनुषंगाने दि.५ एप्रिल रोजी दुपारी ४ वा आ.अनुपभैय्या अग्रवाल यांचे कार्यालय गणपती पॅलेस समोर धुळे येथे बैठक होणार आहे. उपस्थितीचे आवाहन चौधरी, अंपळकर प्रा.कचवे यांनी केले आहे.

# युवकाचा मृत्यू

धुळे, दि.४- शहरातील शासकीय दुध डेअरीजवळ नवीन रेल्वे भुयारी मार्ग येथून दुचाकीवर जाणारा कुलदीप दिनेश निमोणकर हा तरुण खाली कोसळल्याने त्याचा मृत्यू झाला. ही घटना काल रात्री अकरा वाजेच्या सुमारास घडली. याप्रकरणी शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास पो.ना. बागुल करीत आहेत.

प्रकाश में आज विश्वनाथ











## शब्दकोडे क्रमांक : २१२८



आडवे शब्द : १.लाटणे ३.अक्षरांवर मारण्यात येणारी टोपी ५.स्त्रिया कपाळावर लावतात ७.कालवण ९.चुंबन १०.लक्ष ११.नायक १३.जननी १४.चुलता १५.तीर १६.रत्न १८.अधिकारपत्र,प्रमाणपत्र,राजपत्र,शासनपत्र २०.सबर २१.गोंगाट २२.थोर २४.खुरापत २९.अभिनेत्री 'करीष्मा कपूर' हिच्या अभिनेत्री बहीणीचे नाव ३३.एक मोठ्या आकाराचा पक्षी ३५.पलीकडे ३६.नवीन ३७.एक बीन वासाचे फुल ३८.चारपाई ४०.धागा ४१.देह ४२.तडजोड,बंदोबस्त ४६.नवरा ४७.आमीर खान, काजोल यांचा एक सिनेमा ४८.शाहरुख खान, सलमान खान यांचा एक सिनेमा ४९.भारताच्या मध्यप्रदेश राज्यातील रायसेन जिल्ह्यातील एक शहर

उभे शब्द : १.चण्याचे पीठ २.पुरुष ४.एक दिवंगत भारतीय क्रिकेटपटू 'रमन - -' ५.समीक्षा ६.द्रव पदार्थ मोजण्याचे प्रमाण ८. चीज,वस्तू, जिन्नस ९.ठेकेदार १२.एक मोठ्या आकाराचे फळ १४. कर्ण १५.लाज १७.आमटीवर तरंगणारा तेलाचा तवंग १८.उपदेश १९.इंग्रजीत-धाव २१.कठीण २३.दैना २५.राघूची जोडीदारीण २६.देवापुढे जाळतात ती पांढरी वडी २७.कवी कृष्णाजी केशव दामले यांचे टोपणनाव २८.सागर मंथनातून निघालेले एक द्रव्य ज्याच्या सेवनाने देवता अमर झाले ३०.रांग ३१.अलमारी ३२.भव्य ३४.मजबूत ३८.घराणे ३९.हिमालयातून उगम पावणारी एक पवित्र नदी ४२.हगवण ४३.एक चर्म वादय ४४.शूर ४५.अट-उलट लिहा

शब्दकोडे क्रमांक : २१२७ चे उत्तर



## पान १ वरुन

## हॉस्पिटलमध्ये गर्भवती महिलेचा मृत्यू

डॉ.दिलीप घैसास यांच्या अश्विनी नर्सिंग होम येथील रुग्णालयात जाऊन कार्यालयाची तोडफोड केली आहे.

दरम्यान, पुण्यातील दीनानाथ मंगेशकर हॉस्पिटलप्रकरणी राज्याच्या आरोग्य उपसंचालकांनी नेमलेल्या समितीकडून आज राज्य सराकारला अहवाल देण्यात येणार आहे. समितीचे सदस्य उपचार झालेल्या तिन्ही रुग्णालयात दाखल झाले असून चौकशी सुरू आहे.

**शिवसेनेचे तिरडी आंदोलन**

दीनानाथ मंगेशकर रुग्णालय बाहेर पुण्यातील शिवसेना शिंदे गटाने तिरडी आंदोलन करत दिनानाथ रुग्णालयात प्रशासनाचा निषेध केला आहे. रुग्णालय प्रशासनाच्या हलगींपणामुळे एका महिलेला जीव गमवावा लागल्याने रुग्णालयाबाहेर विविध पक्ष आणि संघटना आक्रमक झाल्या असून आज शिवसेना शिंदे गटाने चक्क तिरडी बांधून आंदोलन केले.

**भिसे कुटुंबीयांचा अहवालावर आक्षेप**

दीनानाथ मंगेशकर रुग्णालयाने सादर केलेला अहवाल खोटा आहे, मी उद्या मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांना भेटून याबाबतची कल्पना देणार असल्याचे भाजपचे विधानपरिषदेचे आमदार अमित गोरखेंनी म्हटलेय. डॉ. घैसास, डॉ.केळकर यांचे आणि माझे पीए सुहास भिसेंचे कॉल रेकॉर्ड तपासावेत यातून सर्व सत्य बाहेर येईल, अशी मागणी गोरखेंनी अहवाल पाहिल्यानंतर केली. आता अहवालात किमान १० लाख रुपये ऍडव्हान्स मागितल्याची कबुली रुग्णालयाने दिली, मात्र तनीषा भिसेंना कॅन्सर होता, अशी खोटी शंका रुग्णालयाने उपस्थित केल्याचा दावाही गोरखेंनी केला आहे.

## अजित पवारांकडून चौकशीचे आदेश

माध्यमांसमोर त्यांचे म्हणणे मांडले असले, तरी शासन या प्रकरणाचा सर्व संबंधित घटकांची सखोल चौकशी करून योग्य ती कारवाई करेल. या घटनेबाबत आंदोलन करणाऱ्या व्यक्ती, संस्था आणि संघटनांच्या भावना शासनाने समजून घेतल्या आहेत. चौकशीच्या निष्कर्षानुसार दोषी आढळणाऱ्यांवर कायद्यानुसार कठोर कारवाई केली जाईल. तसेच अशा घटना भविष्यात घडू नयेत यासाठी आवश्यक ती खबरदारी घेण्याच्या स्पष्ट सूचना प्रशासनाला देण्यात आल्या आहेत. सर्व नागरिकांनी संयम बाळगावा आणि प्रशासनास सहकार्य करावे, असे आवाहन उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी केले आहे.

## वक्फ दुरूस्ती विधेयक, कॉँग्रेस सुप्रीम कोर्टात

विधेयक, २०२४ च्या घटनात्मक वैधतेलाही सर्वोच्च न्यायालयात आव्हान देणार आहे, असे जयराम रमेश यांनी आपल्या पोस्टमध्ये पुढे म्हटले आहे. या पोस्टच्या शेवटी जयराम रमेश म्हणाले की, आम्ही भारतीय संविधानात समावेश असलेल्या तत्वांवर, तरतुदींवर आणि परंपरांवर मोदी सरकारच्या प्रत्येक हल्ल्याचा जोरदार विरोध करत राहू.दुसरीकडे कॉँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष मल्लिकार्जून खरगे यांनीही वक्फ दुरुस्ती विधेयक दोन्ही सभागृहात मंजूर झाल्यानंतर टीका केली आहे. मल्लिकार्जून खरगे यांनी त्यांच्या एक्स अकांउंटवर सभागृहातील भाषणाचा एक व्हिडिओ पोस्ट करत म्हटले आहे की, वक्फ दुरुस्ती विधेयकाबाबत देशात असे वातावरण निर्माण झाले आहे की, हे विधेयक अल्पसंख्याकांना त्रास देण्यासाठी आणले गेले आहे. रात्री उशिरा लोकसभेत हे विधेयक मंजूर झाले तेव्हा त्याच्या बाजूने २८८ आणि विरोधात २३२ मते पडली. हे का घडले? याचा अर्थ विधेयकात अनेक त्रुटी आहेत. यावरून आपण अंदाज लावू शकतो की विविध पक्षांच्या विरोधाला न जुमानता, हे विधेयक मनमानी पद्धतीने आणले गेले आहे.

## मनोज कुमार काळाच्या पडद्याआड

या ठिकाणी झाला. मनोज कुमार यांचे खरे नाव हरिकिशन गिरी गोस्वामी असे होते. चित्रपटसृष्टीच्या प्रेमासाठी त्यांनी आपल्या नावात बदल केला होता. पण त्यांना खरी ओळख भारत कुमार या नावाने मिळाली. हरिकिशन गिरी गोस्वामी यांचे कुटुंब फाळणीनंतर भारतात आले आणि दिल्लीत स्थायिक झाले. लहानपणापासूनच त्यांना अभिनयाची आवड होती. अशोक कुमार, दिलीप कुमार आणि कामिनी कौशल यांच्या चित्रपटांमुळे ते खूप प्रभावित झाले. यामुळे त्यांनी आपले हरिकिशन हे नाव बदलत मनोज कुमार असे केले.

मनोज कुमार यांनी कॉलेजच्या काळात अनेक नाटकांमध्ये सक्रिय सहभाग घेतला. त्यानंतर ते मुंबईत आले. १९६० मध्ये फॅशन या चित्रपटातून त्यांनी आपल्या अभिनय कारकिर्दीची सुरुवात केली. १९५७ मध्ये कांच की गुड़िया या चित्रपटात ते पहिल्यांदा मुख्य भूमिकेत दिसले. हा चित्रपट सुपरहिट ठरला. यानंतर उपकार, पत्थर के सनम, रोटी कपडा और मकान, संन्यासी आणि क्रांती यांसारख्या अनेक चित्रपटात ते झळकले. त्यांच्या बहुतेक चित्रपटांमध्ये त्यांचे नाव भारत असे असायचे. याच कारणामुळे चाहत्यांमध्ये ते भारत कुमार म्हणून लोकप्रिय झाले.

**मनोज कुमार यांचे गाजलेले चित्रपट**

मनोज कुमार यांचे वह कौन थी, पूरब और पश्चिम, शोर, हरियाली और रास्ता, गुमनाम, शहीद, पत्थर के सनम, सावन की घटा, क्रांति हे सिनेमे अत्यंत सुपरहिट ठरले. शहीद सिनेमातील त्यांच्या शहीद भगतसिंहांच्या भूमिकेचे तत्कालिन पंतप्रधान लालबहादूर शास्त्री यांनीही कौतुक केले होते. १९६२ मध्ये विजय भट्ट यांच्या हरियाली और रास्ता या चित्रपटाने त्यांना सर्वात मोठे यश मिळाले, जो व्यावसायिकदृष्ट्या हिट ठरला. या चित्रपटात माला सिन्हा होत्या. हरियाली और रास्ता, शादी चित्रपटाच्या यशानंतर डॉ.विद्या आणि गृहस्थी या तिन्ही चित्रपटांनी बॉक्स ऑफिसवर चांगली कमाई केली.

## दारूबंदीच्या मागणीसाठी महिलांचा मोर्चा

यांच्याकडे महिला गेल्या. त्यांच्यासमोर त्यांनी स्वतःवर गुदरलेले प्रसंग मांडले. शत्रुघ्न पाटील यांनी आश्वासन दिले की ग्रामपंचायतीने संपूर्ण दारू बंदीचा ठराव करावा, दारूबंदी समिती स्थापन करावी, ते सांगतील त्या ठिकाणी छापे टाकून अवैध व्यवसाय नष्ट केले जातील. दरम्यान पोलीस ठाण्यातर्फे नियमित कारवाई करून अवैध दारूविक्री रोखण्याचे प्रयत्न सुरू असल्याचेही त्यांनी सांगितले. यावेळी महिलांनी पोलीस ठाण्यास निवेदन दिले. मद्यविक्री तातडीने रोखावी अन्यथा महिलाच कायदा हातात घेऊन ते काम करतील असा इशारा कमला कोळी, अनिता कोळी पुष्पा कोळी, नर्मदा माळी, सारिका कोळी, भटाबाई कोळी, निर्मला कोळी, सुशीला कोळी, सुनिता कोळी, बेबाबाई कोळी आदींनी निवेदनातून दिला.

## भाविकांसाठी दर अर्ध्या तासाला एसटी

४० पर्यवेक्षकीय अधिकारी व कर्मचाऱ्यांची नियुक्ती करण्यात आलेली आहे. हे कर्मचारी दिवसा व रात्र पाळीत २४ तास प्रवाश्यांच्या मदतीसाठी व मार्गदर्शनासाठी उपलब्ध असतील.

**उत्पन्न वाढीसाठी आगारांना देण्यात आले उद्दिष्ट**

सप्तशृंगी गडावरील यात्रेतून धुळे विभागातील विविध आगारांच्या माध्यमातून जास्तीत जास्त उत्पन्न मिळविण्यासाठी प्रत्येक आगाराला ठराविक उद्दीष्ट देण्यात आले असून त्यापेक्षा जास्त उत्पन्न आणण्याचे आवाहन विभाग नियंत्रक विजय गिते, यंत्र अभियंता पंकज महाजन यांच्यावतीने आगारातील आगार व्यवस्थापक व पर्यवेक्षकीय अधिकारी-कर्मचारी यांना करण्यात आले आहे.

**चैत्र पौर्णिमेच्या दिवशी जादा बसेसची व्यवस्था**

शनिवार दि.१२ एप्रिल रोजी पहाटे ३ वाजून २१ मिनिटांनी पौर्णिमेला प्रारंभ होणार असून रविवार दि.१३ एप्रिल रोजी पहाटे ५.५१ वाजेपर्यंत पौर्णिमा असणार आहे. पौर्णिमेच्या दिवशी सप्तशृंगी गडावर दर्शनासाठी मोठ्या प्रमाणात भाविकांची गर्दी होत असते. भाविकांच्या सोयीसाठी शनिवार व रविवारी इतर दिवसांपेक्षा जास्त प्रमाणात जादा बसेसच्या व्यवस्थेचे नियोजन महामंडळातर्फे करण्यात आले आहे.

## वृद्ध इसम जागीच ठार

८१ वर्षीय वयोवृध्द मयताचे नाव असून एम एपी ४६ पी ४३५६ या वाहन चालकाविरोधात म्हसावद पोलिसांत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. रतीलाल भिका वाघ यांनी पोलिसां फिर्याद दिली आहे. सपोनि गणेश वारुळे यांच्या मार्गदर्शनाखाली पोह जितेंद्र पाडवी यांच्याकडे तपास देण्यात आला आहे.

## पान १ वरुन

## अतिक्रमणे हटविण्यात दिरंगाई का?

व्यावसायिकानी दुकाने थाटली आहेत. सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अखत्यारीत रस्ता आहे. त्यांच्यासह पोलीसांची मदत घेवून अतिक्रमण काढण्याला सुरूवात केली पाहिजे. रस्त्यालगतच्या दुकानदारांना टॉवर बगीचात जागा उपलब्ध करून द्यायला पाहिजे, तेही झाले नाही. या प्रकरणामागे तुमचा काही इंटरेस आहे का ? यावर खुलासा करतांना अतिक्रमण विभागाचे प्रसाद जाधव यांनी दि.१४ एप्रिल नंतर साक्री रस्त्यालगतचे अतिक्रमण काढले जाईल असे नमुद केले.

महाराष्ट्र सुवर्ण जयंती महाभियान नगरोत्थान जिल्हास्तर अंतर्गत रस्ता काँक्रिटीकरण, स्मशानभूमी बैठक व्यवस्था, गटार, संरक्षक भिंत उभारणे, रस्ता डांबरीकरण यांसारख्या अनेक कामांना मंजुरी देण्यात आली. स्वच्छ भारत अभियान २.० अंतर्गत ओला आणि सुका कचऱ्याची विल्हेवाट लावण्यासाठी उभारण्यात येणाऱ्या मशिनरी उभारणीचा विषय सभेत मांडतांना अनेक त्रुटी राहिल्याने हा विषय तहकुब ठेवण्यात आला. मानधनावरील कनिष्ट अभियंता, औषध निर्माता, डाटा ऐंट्री व वॉचमन यांचा सहा महिन्यांची मुदतवाढ देण्यात आली. यांसारख्या अनेक विषयांना मंजुरी देण्यात आली.

## भरपाई मिळवून देण्यासाठी प्रयत्न

शेतकऱ्यांच्या बांधावर जाऊन नुकसान पाहणी केली. यावेळी आ.भदाणे यांनी शेतकऱ्यांशी चर्चा केली. अवकाळी वादळ आणि पाऊसा मुळे प्रचंड नुकसान झाले आहे. महायुती सरकार शेतकऱ्यांच्या सोबत आहे. शेतकऱ्यांचे नुकसान भरपाई प्राप्त करून देण्यासाठी पक्ष कटीबद्ध आहे. अशी ग्वाही आमदार राम भदाणे यांनी दिली आहे. नुकसानीचे सरसकट पंचनामे करून तात्काळ भरपाई कार्यवाही करण्यात यावी अशी सूचना अधिकाऱ्यांना आ.भदाणे यांनी दिल्या आहेत.

यावेळी माजी कृषी सभापती अरविंद जाधव, माजी जि.प.अध्यक्षा धरतीताई देवरे, राष्ट्रवादी जिल्हाध्यक्ष किरण शिंदे, भाजपा जिल्हा उपाध्यक्ष शंकरराव खलाणे, जिल्हा ऊपाध्यक्ष भाऊसाहेब देसले, भाजपा तालुका अध्यक्ष देवेंद्र पाटील, अजय माळी, संजय सैंदाणे, मनिषा ताई खलाणे, ज्योती ताई, अर्जुन गायकवाड, तुषार महाले, भाऊसाहेब देवरे, जगदिश देवरे, सागर देवरे, शरद पाटील, चुडामण महाले, गोटु अमृतसागर, गुलाब बोरसे, नाना वाघ, राजेंद्र परदेशी, तहसीलदार अरूण शेवाळे, गट विकास अधिकारी गणेश चौधरी, तालुका कृषी अधिकारी वाल्मीक प्रकाश, बोराडे, भास्कर जाधव, मंडळ कृषी अधिकारी अरविंद शिवदे, पर्यावेक्षक बोरसे, कृषी सहायक चेतन शिंदे, सर्कल समाधान पाटील ,तलाठी मयूर सोनवणे, आर. डी. माळी, साहेबराव माळी, रतिलाल पाटील, वसंत माळी, एम एस ई बी चे अधिकारी पोलिस पाटील विजय देशमुख, रतिलाल वाघ, तुषार महाले, सुदाम महाजन, सागर तलवारे, सोनू बागुल, गुलाब धनगर, बापू पाटील, संजय पाटील, भाऊसाहेब पाटील, नुकसान ग्रस्त शेतकरी मोठ्या प्रमाणात उपस्थित होते.

दरम्यान, आनंदखेडे येथील पितांबर फकिरा पाटील यांचे शेतातील गोठामध्ये आग लागली होती. या आगीत ८ म्हशी व ६ पारडू यांचा होरपळून मृत्यू झाला होता. या आगीत लाखोंचा चारा, ढेप आदी वस्तू जळून खाक झाले होते. यात लाखों रुपयांचे नुकसान झाले होते. आमदार राम भदाणे यांनी शेतकरी पितांबर पाटील यांची भेट घेतली. झालेल्या नुकसानीचा पंचनामा करून भरपाईसाठी तात्काळ कार्यवाही करण्याची सूचना यावेळी संबंधित अधिकाऱ्यांना दिल्यात.

## कारची काच फोडून रोकड लंपास

प्रकार घडला.प्रताप कुमावत हे आदिवासी प्रकल्प. कार्यालयातील कामानिमित्त.नंदुरबार शहरात आले. आणि एएच १९ सीव्ही ४८६६ या क्रमांकाच्या वाहनात चालक सीटच्या बाजूला बॅगवर नोटांचे बंडल ठेवले.तत्काळ खामगाव रस्त्यावरील आदिवासी प्रकल्प.कार्यालयात येवून वाहन आवारात लावले. ते पाच मिनिटात वाहनाजवळ आले असता गाडीचे काच फोडून कुणीतरी पन्नास हजाराची बंडल लंपास केल्याचा प्रकार समोर आला. कुमावत यांनी पोलिसांत धाव घेतली आहे.कार्यालयात असलेल्या सीसीटीव्हीच्या माध्यमातून चोर लवकरच सापडेल असा कयास लावण्यात येत आहे. वर्दळ असतांना चोराने काच फोडून रक्कम लंपास करण्याचे धाडस केलेच कसे, असा प्रश्न उपस्थित केला जात आहे.

## शिरपूर पं.स.चे हजारो अर्ज पडून!

आहेत.त्या अर्जात ठराव दिलेले ग्रामपंचायत सरपंच यांचा कालावधी संपलेला आहे. ग्रामसेवक, पशुधनाचा दाखला देणारे पशुधन विकास अधिकारी यांच्या बदल्या झालेल्या आहेत. तसेच सातबारा उतारा व नमुना अ यांचा कालावधी देखील संपलेला आहे. यामुळे अर्जाची स्वीकृती झाल्यास भविष्यात लाभार्थी यांना अनेक अडचणी येणार आहेत. यासाठी संबंधित लाभार्थी यांनी अजून किती वर्ष आपल्या हक्काचा योजनेचा लाभ घेण्यासाठी वाट पाहावी लागणार आहे. भविष्यात ही योजना बंद झाल्यास पात्र लाभार्थी वंचित राहिल्यास याला जबाबदार कोण असणार? दररोजचा अर्जांचा संख्येत वाढ होत आहे. पात्र लाभार्थी यांना लवकरात लवकर लाभ द्यावा, अशी मागणी यावेळी करण्यात आली.

## पोलिसांनी गांजा तस्करी रोखली

येथे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तो सदरचा माल कुठे घेऊन चालला होता? याचा अधिक तपास तालुका पोलीस करत आहे. परिविक्षादीन पोलीस उपआधीक्षक सागर देशमुख यांना मिळालेल्या माहितीच्या आधारे तालुका पोलिसांच्या पथकाने मुंबई आग्रा महामार्गावर कारवाई केली आहे. सदरची कारवाई जिल्हा पोलीस अधीक्षक श्रीकांत धिवरे, अप्पर पोलीस अधीक्षक किशोर काळे, उपविभागीय पोलीस अधिकारी संजय बांबळे यांच्या मार्गदर्शनाखाली परीविक्षादीन पोलिस उपअधिक्षक सागर देशमुख यांच्या नेतृत्वात पोलीस उपनिरीक्षक दीपक धनवटे, पोलीस कॉन्स्टेबल रवींद्र सोनवणे, पोलीस कॉन्स्टेबल महेंद्र गिरासे, पोलीस कॉन्स्टेबल सुरेंद्र खांडेकर, पोलीस कॉन्स्टेबल योगेश पाटील, पोलीस कॉन्स्टेबल धीरज सांगळे, पोलीस कॉन्स्टेबल कुणाल शिंगाणे, चालक पोलीस हवालदार अशोक पाटील यांच्या पथकाने कारवाई केली आहे.

## मानधनवाढीसाठी मनसेचे आयुक्तांना निवेदन

नाही. शिक्षकांना येत्या तीन दिवसांत नियुक्ती आदेश देण्यात यावे तसेच मानधनही द्यावे. आयुक्तांच्या आदेशाला केराची टोपली दाखवणाऱ्या अधिकाऱ्याला काळे फासण्याचा इशारा मनसेचे हर्षल परदेशी, गौरव गिते, संकेत सोनार, शुभम माळी, भावेश गद्रे, ओंकार सोनार, जय सोनार, तेजस काळबांडे व कार्यकर्त्यांनी दिला आहे.

**आयुक्त संतापल्या**

मनसे पदाधिकारी शिक्षकांच्या मानधनाबाबत निवेदन देत असतांना शाळा क्र.९ च्या शिक्षिकांनी आयुक्तांच्या दालनात प्रवेश करताच आयुक्त अमिता दगडे-पाटील संतापल्या. मनपाच्या कर्मचारी असतांना पक्षांच्या पदाधिकाऱ्यांसोबत का आल्या ? पगार मनपा देते शिस्तीत काम करा. तुम्ही आधी बाहेर जा म्हणत आयुक्तांनी शिक्षिकांना दालना बाहेर काढले. राजकीय दबावातून प्रश्न सोडविता येत नाहीत. पक्षासोबत आलेल्या असाल तर नोकरी जाईल. असे शिक्षिकांना खडसावले. यावेळी मनसे पदाधिकारी व आयुक्तांमध्ये शाब्दीक चकमक उडाली.

**कारणे दाखवा नोटीस**

आयुक्त तथा प्रशासक अमिता दगडे-पाटील यांनी मानधनासह मुदतवाढ मिळावी या मागणीसाठी मनसे पदाधिकाऱ्यांना सोबत आणलेल्या शिक्षिकांना कारणे दाखवा नोटीस द्या. कार्यालयीन शिस्तीच्या विरोधातील वागणे योग्य नाही. असेही आयुक्त म्हणाल्या. तसेच शिक्षिकांचे मानधन वाढवून दहा करणे व सहा महिन्यांची मुदतवाढीचे पत्र देण्यात यावे असे निर्देश उपायुक्त शोभा बच्छाव यांना दालनात बोलावून दिले.

## महापालिकेने जाचक कचरा कर त्वरित रद्द करावा
## शहर राष्ट्रवादी कॉँग्रेस शरद पवार गटाची मागणी

**धुळे, दि.४- कचरा जमा करण्यासाठी धुळे महानगरपालिकेने आता प्रत्येक घरातून दरमहा ५० ते १०० रुपये कर घेणार आहे. कचरा कराच्या वसुलीचा तो आदेश रद्द करण्यासाठी राष्ट्रवादी कॉँग्रेस पार्टी शरदचंद्रजी पवार पक्षाचे शहर जिल्हाध्यक्ष रणजीत राजे भोसले यांच्या नेतृत्वाखाली आंदोलन करून शिष्टमंडळाने अतिरिक्त आयुक्त करूणा डहाळे यांची भेट घेऊन निवेदन दिले आहे.**



महानगरपालिका प्रत्येक घर मालकाकडून प्रत्येक महिन्याला ५० ते १०० रुपये तर दुकानदार, व्यापारी, व्यावसायिक, कार्यालय, फेरीवाले यांच्याकडून १२० रुपये ते १५०० रुपये पर्यंतचे वेगळा कर आकारला जाणार आहे. हा शहरातील नागरिकांवर हा अन्याय आहे. मालमत्ता करामध्ये दरवर्षी विशेष स्वच्छता कर, मलनिसारण कर, मलप्रवाह कर या विविध नावाने स्वच्छता कर धुळेकर नागरिक भरत आहे. घंटागाडी नियमित येत नाही. शहरांमध्ये ठिकठिकाणी कचऱ्यांचे ढीग पडलेले आहेत. एकूण ७९ घंट्यागाड्यांपैकी फक्त २२ घंटागाडी दररोज काम करीत आहे. करोडो रुपयाचा स्वच्छता कचऱ्याचा ठेका देऊन अधिकारी, कर्मचारी, ठेकेदार मालामाल झालेले आहेत. मंदिर, धार्मिक संस्थांना दरमहा ९० रुपये कचरा संकलन कर आकारण्याचे आदेश दिलेले आहेत. वेगवेगळ्या नावाखाली कर वसुली करू नये. अन्यथ तीव्र आंदोलन करण्याचा इशारा राष्ट्रवादी कॉँग्रेस श.प.गटाचे रणजीत राजे भोसले, नंदू येलमामे, जोसेफ मलबारी, राजेंद्र सोलंकी, यशवंत पाटील, राजेंद्र डोमाळे, भिका नेरकर, राजू मशाल, युसुफ शेख, समद शेख, रामेश्वर साबरे, उजेर शेख, अमीन शेख, कल्पेश मगर, मंगलदास वाघ, सोनू घारू, सुनील अहिरराव, भटू पाटील, दीपक देवरे, राजू चौधरी, युनूस शेख, भूषण पाटील व इतर पदाधिकारी कार्यकर्ते यांनी दिला आहे.

## निधन वार्ता

### डी.एस.हरबा



नंदुरबार, दि.४- नाशिक येथील वीरशैव लिंगायत गवळी समाजाचे जेष्ठ पदाधिकारी आणि सेवानिवृत्त शिक्षक देवजी सटवा हरबा उर्फ डी. एस. हरबा (वय ७१) यांचे दि.३ एप्रिल रोजी संध्याकाळी ७:३० वाजता नाशिक रोड येथे अपघाती निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी, एक मुलगा, सून, तीन मुली, जावई, नातवंडे असा परिवार आहे. नंदुरबार येथील देसाई पेट्रोल पंपासमोरील रेल्वेचे निवृत्त कर्मचारी अशोक गवळी व किशोर यादबोले यांचे ते मेहुणे होत.

### दत्तीबेन पटेल

नंदुरबार, दि.४- येथील देसाईपुरा भागात राहणाऱ्या दत्तीबेन ब्रिजलाल पटेल (वय ७७) यांचे ३१ मार्च रोजी सायंकाळी पाच वाजता राहत्या घरी अल्पशा आजाराने निधन झाले. त्या तालुक्यातील पाटोंदा येथील ब्रिजलाल पटेल यांच्या धर्मपत्नी होत. त्यांच्या मागे मुलं, मुली, जावई, नातवंड असा परिवार आहे. समशेरपुर येथील स्व.हरी पटेल यांच्या त्या कन्या होत.

## धुळ्यात चौदा एप्रिलपर्यंत समता पंधरवड्याचे आयोजन

धुळे, दि.४- महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीच्या औचित्य साधुन सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग व जिल्हा जात प्रमाणपत्र पडताळणी समिती, धुळे कार्यालयामार्फत १ ते १४ एप्रिल या कालावधीत समता पंधरवड्याचे आयोजन करण्यात आले आहे. अशी माहिती जिल्हा जात प्रमाणपत्र पडताळणी समिती, धुळे संशोधन अधिकारी तथा सदस्य सचिव रविंद्र जाधव यांनी एका प्रसिद्धी पत्रकान्वये दिली आहे. समता पंधरवड्यात जिल्ह्यातील इयत्ता ११ व १२ वीच्या विज्ञान शाखेतील सन २०२५-२०२६ मधील प्रवेशित सर्व मागासवर्गीय विद्यार्थ्यांना जात वैधता प्रमाणपत्र मिळणेसाठी विशेष मोहिमेचे आयोजन करण्यात आले आहे. जेणे करुन नियमित व त्रृटी युक्त प्रकरणे निकाली काढून विद्यार्थ्यांना वेळेत जात वैधता प्रमाणपत्र मिळू शकेल.

**पाहिजेत**
CA ऑफिस करिता अनुभवी अकौन्टंट पाहिजे. Tally चे ज्ञान आवश्यक. समक्ष भेटा!
सिद्धांत अग्रवाल ॲण्ड Associates
ई-५८, एमआयडीसी अवधान, धुळे
9028801353

**WALK IN INTERVIEW**
We are looking highly experienced and skilled personnel for one of our leading Solvent Extraction Plant & Edible Oil Refinery situated at M.I.D.C, Dhule (Maharashtra)
**Accountant - Post-2 (M)**
(B.Com/M.Com /Tally Prime with 5 to 10 years' experience)
**H.R.Manager - Post-1 (M)** (M.P.M./M.B.A.-HR)
(Should have knowledge of all legal compliances with 5 to 6 years' experience)
**Safety Officer - Post-2 (M)**
(Chemical Engineer with Advance Diploma in Industrial Safety having 5 years' experience in Petroleum Products & Chemicals)
**Godown Supervisor- Post-2 (M)**
(Any Graduate with 1 year experience)
Interested candidates may come for **Walk in Interview** on below address on **08.04.2025 to 09.04.2025 between 3:30 pm to 5.30 pm** along with Bio-data, Testimonials and **Passport size photo is essential.**
**Candidates who can't attend the Walk in Interview on above dates can send their resume by mail at sspl_dhl@yahoo.com**
**Please note, candidates who had been interviewed previously for above post need not re-apply.**
**Sanjay Soya Private Limited**
E-131/1, M.I.D.C., Behind S.T. Workshop, Awadhan, Dhule.

**पाहिजेत**
पाण्याचे जार वाटपसाठी माणसे पाहिजेत. आकर्षक पगार मिळेल. समक्ष भेटा!
बुऱ्हानी आईस फॅक्टरी
यल्मा देवी मंदिरासमोर, मालेगावरोड, धुळे
9422230352

**मोफत प्रवेश**
सावली वृद्धाश्रमात मोफत प्रवेश! बेवारस, अंध, अपंग, मनोरूग्ण प्रवेश! आजी-आजोबा यांची सेवा करण्यासाठी २ जागा
-: संपर्क :-
आप्पा खताळ
सावली वृद्धाश्रम, मोहाडी,धुळे
9209789661

**गाळा विकणे आहे**
गाळा क्र.०४, गिरीजा अपार्टमेंट, मलेरिया ऑफिस जवळ, साक्रीरोड, धुळे येथील 10x11 sq.ft. (दुकान) विकणे आहे.
ओम मच्छिंद्र अहिरराव
9359618541

**पाहिजेत**
सेल्समन व अकौन्टंट पाहिजे.
भाग्यश्री एन्टरप्राईजेस
सुनिल चौधरी
9423135555

**पाहिजेत**
नवीन ऑफिस करिता मुला/मुलींची डायरेक्ट भरती
पात्रता- १० वी पास/नापास ते पदवीधर व १८ ते ३० वर्षे पगार ७५००/- ते २५०००/- हजार
रहाणे+जेवण मोफत
संपर्क :- पत्ता:- वाडीभोकर रोड, धुळे मो.९६५७६०८४५९

**कार्टून पुठ्ठा रु.१६.०० प्रति किलो बंडल**
येथे सर्व प्रकारची रद्दी विकत घेतली जाईल.
मेवावाला जिन कम्पाऊंड भारत वे ब्रिज, पारोळारोड,धुळे
फोन : 230540
9422296340

**पाहिजेत**
दुकान कामासाठी हुशार काम करणारी मुले पाहिजेत. आकर्षक पगार त्वरित भेटा!
श्री सत्यनारायण ड्रेसेस
ग.नं.२, जैन मंदिराजवळ, धुळे
9423344965

**मुले पाहिजेत**
कुंडाणे (वार) साक्रीरोड व लळींग येथील पेट्रोल पंपासाठी अनुभवी मुले पाहिजेत तसेच हवा भरण्यासाठी अनुभवी मुले पाहिजेत.
-: संपर्क :-
9822107518

**पाहिजेत**
कापड दुकानासाठी
१) सेल्समन- २
२) सेल्सगर्ल- २
३) हेल्पर- २
समक्ष येऊन भेटा
बेबीज वर्ल्ड
ग.नं.२, लालबाग मंदिर जवळ, धुळे.
-: संपर्क :-
मो.नं.९८५०८३५९९९

**पाहिजेत**
अनुभवी ड्रायव्हर/हेल्पर/डिलीवरी बॉय पाहिजेत.
-: संपर्क :-
एमआयडीसी, धुळे
8879442989




हे पत्र संपादक, मालक, प्रकाशक, हेमंत सुधाकर मदाने यांनी हेमंत प्रिंटींग प्रेस, वीर सावरकर मार्ग, धुळे येथे मुद्रित करून आपला महाराष्ट्र, जनशक्ती, वीर सावरकर मार्ग, धुळे-४२४००१ येथे प्रकाशित केले. दुरध्वनी मुख्य कार्यालय, धुळे (०२५६२) २३५३९६, २३८३९६, aplamaha@gmail.com नंदुरबार २२३४४४ aplamahashd@gmail.com शहादा-२५६९३९, मालेगाव-२४३१३३६, नाशिक-२५७५९८९, पुणे-४००४११५, आपला महाराष्ट्र-रजि.नं.एम.एच.डी.आय.ए.१७ र.नं.११२२२/६०